## थोडक्यात पण महत्वाचे...



### बारामती बस स्थानकात सवलत कार्ड मिळवण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी

बारामती (दैनिक संध्या) : बारामती शहरातील बस स्थानकात सवलत कार्ड मिळवण्यासाठी महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठी गर्दी केल्याचे चित्र आज पाहायला मिळाले.राज्य परिवहन महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या प्रवास सवलतींचा लाभ घेण्यासाठी नागरिकांची बस स्थानकात गर्दी झाली होती. विशेषतःमहिला व ज्येष्ठ नागरिकांना प्रवासात सवलत मिळत असल्याने या कार्डसाठी मोठी उत्सुकता दिसून येत आहे.सकाळपासूनच बस स्थानक परिसरात रांगा लागल्या होत्या.अनेक नागरिकांनी तासन्तास उभे राहून आपला क्रमांक येण्याची प्रतीक्षा केली. काही ठिकाणी व्यवस्थापन अपुरे पडत असल्याचेही दिसून आले. गर्दीमुळे नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागला.उष्णतेमुळे ज्येष्ठ नागरिकांना त्रास सहन करावा लागल्याच्या तक्रारीही समोर आल्या. काही महिलांनी रांगेतील गोंधळ आणि माहितीच्या अभावाबद्दल नाराजी व्यक्त केली. एकूणच,सवलत कार्डसाठी नागरिकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता प्रशासनाने अधिक सक्षम नियोजन करण्याची गरज असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांसाठी अर्ज करण्यास 15 एप्रिलपर्यंत मुदतवाढ

पुणे (दैनिक संध्या) : राज्यशासनाच्या कृषी विभागामार्फत २०२५ च्या राज्यस्तरीय विविध कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन संगणकप्रणालीद्वारे अर्ज करण्याची मुदत आता १५ एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, संस्था आणि कृषी विस्तारकांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषि विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कारांनी सन्मानित केले जाते. पूर्वी ही प्रक्रिया ऑफलाइन स्वरूपात असल्याने शेतकऱ्यांना कागदपत्रांच्या चार प्रती तयार करण्यासाठी मोठा खर्च आणि वेळ लागत असे. ही प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी सरकारने यंदापासून स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल विकसित केले आहे. ऑनलाइन प्रणालीचे हे पहिलेच वर्ष असल्याने तसेच अर्जासोबत जोडवा लागणारा 'जिल्हा पोलीस अधीक्षकांचा चारित्र्य पडताळणी दाखला' मिळविण्यासाठी लागणारा कालावधी पाहता क्षेत्रीय स्तरावरून शेतकऱ्यांनी केलेली मागणी विचारात घेऊन, कृषी विभागाने ही मुदत १५ दिवसांनी वाढवून दिली आहे. यापूर्वी ही मुदत ३१ मार्च रोजी संपणार होती. पुरस्कारांसाठी इच्छुक उमेदवारांनी कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://krishi.maharashtra.gov.in जाऊन 'कृषी पुरस्कार' या टॅबवर आपले प्रस्ताव सादर करायचे आहेत. या डिजिटल प्रणालीमुळे मूल्यांकन आणि अहवाल निर्मितीची प्रक्रिया अधिक विश्वासार्ह होणार आहे. पात्र शेतकरी आणि संस्थांनी या वाढीव संधीचा लाभ घेऊन आपले अर्ज त्वरित सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

### चाकण-आंबेठाण रस्त्यावरील अवजड वाहतुकीवर नियंत्रण; पोलीस प्रशासन अलर्ट



चाकण (दैनिक संध्या) : चाकण - आंबेठाण रस्त्यावरील वाढती वाहतूक कोंडी आणि अपघातांच्या पार्श्वभूमीवर अवजड वाहनांच्या वाहतुकीची वेळ निश्चित करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे यांनी पिंपरी - चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्याकडे केली होती. या मागणी संदर्भात पोलीस प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू असून, त्यानुसार प्राथमिक पातळीवर ठोस उपाययोजना करण्यात आल्या आहेत. महाळुंगे पोलिस स्टेशनतर्फे बिरदवडी वाय - पॉईंट येथे वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एक पोलिस अंमलदार आणि एक ट्रॅफिक वॉर्डन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच वाघजाई नगर येथेही एक पोलिस अंमलदार आणि एक वॉर्डन यांची नेमणूक करण्यात आली आहे. या उपाययोजनांमुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. नितीन गोरे यांनी यापूर्वी पत्राद्वारे नमूद केले होते की, चाकण आंबेठाण मार्गाच्या कडेला मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती असून परिसरात शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि मंगल कार्यालये आहेत. औद्योगिक वसाहतीतून येणाऱ्या अवजड वाहनांमुळे दिवसभर रस्त्यावर मोठी गर्दी होते. त्यामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. विशेषतः विद्यार्थी आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. यावर उपाय म्हणून सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत बिरदवडी ते चाकण मार्गावर अवजड वाहनांना बंदी घालण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. तसेच अवजड वाहनांसाठी बिरदवडी फाटा मार्गे राजगुरुनगर आणि वाघजाईनगर मार्गे तळेगाव चौक असे पर्यायी मार्ग सुचविण्यात आले आहेत.

# सासवडचे ग्रामदैवत श्री भैरवनाथांच्या चैत्री उत्सवाचा जल्लोष

## विविध कार्यक्रमांची मांदियाळी!

सासवड (दै. संध्या)

सालाबादप्रमाणे सासवडचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ, श्री भैरवनाथ व माता जोगेश्वरी यांचा चैत्रोत्सव यंदा मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. शुक्रवारी दि. ३ ते दि. ६ एप्रिल या काळात हा उत्सव संपन्न होणार असून, यानिमित्ताने शहरात धार्मिक, सांस्कृतिक आणि क्रीडा विषयक विविध भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाची माहिती काळभैरवनाथ ट्रस्टचे अध्यक्ष रमेश वामनराव जगताप व भैरवनाथ चैत्री उत्सव मंडळाचे अध्यक्ष अजय गणपत जगताप यांनी दिली. यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष पांडुरंग भोंगळे, गावपाटील संग्राम जगताप, चैत्रोत्सवाचे उपाध्यक्ष नितीन भोंगळे, रवींद्रपंत जगताप, विजय जगताप, वैभव जगताप, आदी मान्यवर उपस्थित होते.

उत्सवाची सुरुवात शुक्रवार, ३ एप्रिल रोजी पहाटे श्रींच्या महापूजेने होईल. सकाळी ७ वाजता ध्वज बांधून बगाड फिरवण्याचा कार्यक्रम पार पडेल. याच दिवशी सकाळी ६ ते ७ या वेळेत योग विद्या संस्कार केंद्राच्या वतीने घनश्याम खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सूर्यनमस्कार घातले जातील. सकाळी ९ वाजता पारंपारिक बगाडाचा कार्यक्रम मंदिरासमोर होईल. विशेष आकर्षण म्हणजे सायंकाळी ५ ते पहाटे ३ वाजेपर्यंत श्रींची भव्य पालखी मिरवणूक (छबीना) निघणार असून, यासाठी आकर्षक बक्षिसेही ठेवण्यात आली आहेत.



शनिवार, ४ एप्रिल रोजी सायंकाळी भव्य कुस्ती आखाड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने स्व. ना. चंदूकाका निवृत्ती जगताप यांच्या स्मरणार्थ माजी आमदार संजय जगताप यांच्याकडून शेवटच्या मानाच्या कुस्तीसाठी १ लाख रुपयांचे ईनाम घोषित करण्यात आले आहे. कुस्ती शौकिनांसाठी ही मोठी पर्वणी ठरणार आहे.

रविवार, ५ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता किर्लोस्कर कंपनीच्या पाठीमागे वाघ डोंगरावर 'भैरवनाथ केसरी' बैलगाडा शर्यतीचा थरार रंगणार आहे. त्याच दिवशी रात्री पुरंदर कला मंचाच्या वतीने 'चैत्रोत्सव' हा हिंदी-मराठी गाण्यांचा आणि नृत्याचा बहारदार कार्यक्रम सादर होईल. सोमवार, ६ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता कन्हैया चौक येथे 'पाव्हनं चीज मी लय कडक' हा मनोरंजनाचा कार्यक्रम पार पडेल.

**कावड आगमन**

मंगळवार, ७ एप्रिल रोजी शिखर शिंगणापूरहून येणाऱ्या तेल्याभुत्याच्या कावडीचे सासवडमध्ये आगमन होईल. जेजुरी नाका ते महादेव मंदिरापर्यंत स्वागत सोहळा व मिरवणूक काढण्यात येईल. बुधवार, ८ एप्रिल रोजी पालखी तळ येथे 'द केरला स्टोरी टू' हा चित्रपट दाखवण्यात येईल. गुरुवार, ९ एप्रिल रोजी धन्य निरंकार सत्संग व हनुमान सेवाभावी भजनी मंडळाचा पारंपारिक भजनाचा कार्यक्रम होऊन उत्सवाची सांगता होईल.

# पुरंदरला क्रीडा विकासाची मोठी संधी

## ■ दिवे येथे तालुका क्रीडा संकुलासाठी २ कोटींचा निधी मंजूर ■

नाझरे सुपे (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील क्रीडा विकासाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात दिवे येथील तालुका क्रीडा संकुलासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ३१ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. शासनाने जाहीर केलेल्या निधी तालिकेनुसार पुरंदर तालुका क्रीडा संकुलासाठी २०० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या निधीमुळे तालुक्यातील क्रीडा सुविधांचा विकास होण्यास मदत होणार असून ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहेत. माजी आमदार संजय जगताप यांनी या निधीसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा निधी मंजूर झाल्याची चर्चा क्रीडा क्षेत्रात होत आहे.

उभारण्यात येणाऱ्या क्रीडा संकुलामध्ये विविध खेळांसाठी आवश्यक सुविधा, धावपट्टी तसेच खेळाडूंसाठी मूलभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना सरावासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.





"पुरंदर तालुक्याला कबड्डी, व्हॉलीबॉल, कुस्ती, आर्चरीसह विविध खेळांची समृद्ध परंपरा आहे. अनेक खेळाडूंनी पोलीस व इतर शासकीय सेवांमध्ये नाव कमावले आहे. खेळाडूंना दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठी सातत्याने प्रयत्न केले. या निधीमुळे नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळेल," अशी प्रतिक्रिया माजी आमदार संजय जगताप यांनी दिली.

**निधी मंजुरीचा तपशील**

तालुका – पुरंदर (जि. पुणे)
योजना – तालुका क्रीडा संकुल
मंजूर निधी – २ कोटी रुपये
आर्थिक वर्ष – २०२५–२६
शासन निर्णय – ३१ मार्च २०२६
विभाग – शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# रिझर्व बँकेच्या ९१ व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष कार्यक्रम संपन्न



नारायणगाव (दै. संध्या)

ग्रामोन्नती मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र व संशोधन केंद्राच्या वतीने रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या ९१ व्या वर्धापनदिनानिमित्त विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले, अशी माहिती प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी यांनी दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आनंद कुलकर्णी होते.

प्रमुख वक्ते प्रा. डॉ. श्रीकांत फुलसुंदर यांनी रिझर्व बँकेच्या स्थापनेचा इतिहास, कार्यपद्धती आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील भूमिकेचा सविस्तर आढावा घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रिझर्व बँक ऑफ इंडियाची स्थापना होण्यापूर्वीची असणारी भारतातील बँकांची परिस्थिती व त्या बँकांचे नियमन आणि बँक स्थापनेचा इतिहास विद्यार्थ्यांपुढे मांडला.

यावेळी डॉ. जे. पी. भोसले यांनी रिझर्व बँकेशी संबंधित कायदे व त्यांच्या अंमलबजावणीवर प्रकाश टाकला. डॉ. अनिल काळे यांनी बँकिंग व्यवस्थापनात भाषेचे महत्त्व स्पष्ट केले, तर डॉ. दिलीप शिवणे यांनी अर्थव्यवस्थेत चलनाची भूमिका विशद केली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. कुलकर्णी यांनी आर्थिक संकटाच्या काळात रिझर्व बँकेची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. तसेच व्यापारचक्रातील चढ-उतार नियंत्रित ठेवण्यात व बँकिंग क्षेत्राचे नियमन करण्यात रिझर्व बँक महत्त्वाची संस्था आहे. जेव्हा जेव्हा देशावर आर्थिक संकटे निर्माण होतात तेव्हा अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून आर्थिक संकटाचे निवारण करण्यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाची असणारी भूमिका ही महत्त्वाची असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# नाट्यातून अनुभवला भगवान महावीरांच्या जीवनाचा अद्भूत प्रवास

## महावीर जयंतीनिमित्त जैन सामुदायिक उत्सव समितीच्यावतीने आयोजन

पुणे (दै. संध्या)

तीर्थंकर भगवान महावीर यांच्या २६२५व्या जन्म कल्याण सोहळ्यानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात भगवान महावीर यांच्या २७ भवांचा अद्भूत प्रवास " कर्मबंधन " गलतियों से मोक्ष तक की अद्भूत यात्रा पुणेकरांनी अनुभवली. गणेश कला क्रीडा मंच येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नृत्य, नाट्याभिनयातून कलाकारांनी भगवान महावीर यांचा आधीचे जन्म, मनाच्या-आत्म्याच्या विविध अवस्था यांचे दर्शन घडवले.



भगवान महावीर यांना लाभलेले भगवान महावीर हे रूप हा प्रवास नाट्यसादरीकरणात मांडण्यात आला. जैन सामुदायिक उत्सव समिती (सकल जैन संघ) तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.मुंबईतील सचिन शहा यांच्या रंगत प्रॉडक्शनतर्फे हे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी हजारो दिव्यांनी भगवान महावीरांची आरती करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पूर्वा शहा आणि त्यांच्या शिष्यांनी कथकच्या माध्यमातून नवकार महामंत्राचे सादरीकरण केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रायोजक माणिकचंद ग्रुपचे प्रकाश रसिकलाल धारिवाल यांचा हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. या प्रसंगी दिना धारीवाल, आदित्य धारीवाल, साक्षी रोहीत मेहता, विजयकांत कोठारी, ॲड. एस. के जैन, राजेश शहा, विजय भंडारी, मिलींद फडे, राजकुमार चोरडीया, जैन सामुदायिक उत्सव समितीचे अध्यक्ष अचल जैन, अनिल गेलडा, संपत जैन, समीर जैन, दिलीप मेहता, सुधीर शहा, सुनील कटारिया, संदिप भंडारी, प्रवीण चोरबोले, ललित गुंदेशा, इंद्रजी जैन, इन्द्रकुमार छाजेड, विरेन शहा उपस्थित होते.

अचल जैन यांनी प्रास्ताविकात जैन समाजातील विविध संघटना आणि मागील ७४ वर्षांपासून महावीर जयंतीच्या निमित्ताने कार्यक्रमांचे केले जाणारे आयोजन याबाबत माहिती दिली. महावीर जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेली शोभायात्रा आणि विविध कार्यक्रमांमध्ये क्रमांक पटकावलेल्यांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

# पिंपरी-चिंचवडच्या विकासकामांना स्थायी समितीची गती

## आरोग्य, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांच्या प्रस्तावांना मंजुरी

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत आज शहरातील विविध विकासकामे व विभागनिहाय प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे होते. यावेळी स्थायी समिती सदस्य शालिनी गुजर, मनीषा चिंचवडे, संदीप कस्पटे, सारिका गायकवाड, योगिता नागरगोजे, कृष्णा सुरकुले, अर्चना करांडे, मधुरा शिंदे, बाबासाहेब त्रिभुवन, सविता आसवानी, शीतल वर्णेकर, संतोष कोकणे, संदीप वाघेरे, विकास साने, सुलभा उबाळे यांच्यासह नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, विक्रांत बगाडे तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत शहरातील विविध विकासकामांशी संबंधित प्रस्तावांवर चर्चा करून त्यांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये पिंपरी येथील नवीन जिजामाता रुग्णालयातील विद्युत देखभाल व दुरुस्ती कामांसाठी खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच 'फ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत शाळा, इमारती व कार्यालयांमधील हमी कालावधी संपलेले नादुरुस्त इन्व्हर्टर व बॅटरी बदलणे, आवश्यकतेनुसार नवीन इन्व्हर्टर बसविणे व संबंधित कामांसाठी खर्चास मंजुरी देण्यात आली.

भोसरी (मौजे कासारवाडी) येथील स. नं. ४९८ मधील मंजूर विकास योजनेनुसार प्रस्तावित १२ मीटर रस्त्यासाठी भूसंपादन करण्यासही मान्यता देण्यात आली. रावेत येथील अशुद्ध जलउपसा केंद्रातील १६०० किलोवॅट क्षमतेच्या रोहित्र संच व ब्रेकर्सच्या देखभाल-दुरुस्ती तसेच संबंधित कामांसाठीही खर्च मंजूर करण्यात आला. तसेच सेक्टर १० येथे पर्यायी ट्रान्सफॉर्मर व आरएमयू युनिट बसविण्यास मंजुरी देण्यात आली.



याशिवाय, विविध पंपिंग हाऊस येथे सॉफ्ट स्टार्टर बसविणे, झोपडपट्टीधारकांच्या तात्पुरत्या पुनर्वसनासाठी चिंचवड (सर्व्हे नं. २९/२) येथील सुमारे ३० हजार चौ. फुट जागा संक्रमण शिबिरासाठी ३ वर्षे भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे, 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. ६ मधील पाणीपुरवठा ट्रेंचेसचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे तसेच पेव्हिंग ब्लॉक दुरुस्ती करणे यांसारख्या कामांना मंजुरी देण्यात आली. थेरगाव गावठाण पंप हाऊस येथील पंपाची क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक विद्युत कामे, तसेच पुणे महानगर परिवहन मंडळाच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील संचलन तुटीच्या लेखापरीक्षण अहवालाच्या अवलोकनासाठी खर्चासही मान्यता देण्यात आली.

वैद्यकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी १९ टाटा सुमो अथवा तत्सम वाहने २ वर्षांसाठी भाडेतत्त्वावर घेण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच प्रभाग क्र. ८ मधील पशुवैद्यकीय दवाखान्यात डॉग शेड परिसरातील किरकोळ स्थापत्य दुरुस्ती, विविध कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था, प्रभाग क्र. ९ व २ मधील स्वच्छतागृह दुरुस्ती, तसेच मासुळकर कॉलनी, यशवंतनगर आदी भागांतील दुरुस्ती कामांसाठीही खर्चास मान्यता देण्यात आली.

निगडी सेक्टर २३ येथील उद्यानातील स्थापत्य कामे, कासारवाडी येथील मैलाशुद्धीकरण केंद्रासाठी सीमाभिंत बांधकाम, तसेच सांगवी-किवळे रस्त्यावरील बस थांब्यांची देखभाल व दुरुस्ती यांसारख्या कामांनाही स्थायी समितीने मंजुरी दिली.

"पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आजच्या स्थायी समिती बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली आहे. प्रामुख्याने आरोग्य सुविधांचे सक्षमीकरण, पाणीपुरवठा यंत्रणेतील तांत्रिक सुधारणा आणि प्रलंबित रस्ते विकासाच्या कामांवर आम्ही भर दिला आहे. जिजामाता रुग्णालयातील विद्युत कामे असोत किंवा रावेत उपसा केंद्राची दुरुस्ती, नागरिकांना अखंडित सेवा मिळावी हाच आमचा उद्देश आहे. झोपडपट्टी पुनर्वसनासाठी संक्रमण शिबिराची उपलब्धता आणि महापालिका शाळांमधील सुविधांच्या दुरुस्तीमुळे सर्वसामान्यांचे जीवन सुसह्य होण्यास मदत होईल. शहराच्या हिताचे हे सर्व प्रकल्प कालबद्ध मर्यादित पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत."

**- अभिषेक बारणे (सभापती, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका)**